# <u>प्राधिकरणाच्या जमिनीच्या परिरक्षणासाठी नियुक्त केलेल्या संस्थाबाबत</u>

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वेगवेगळ्या ठिकाणी जमिन व मालमत्ता आहे. तसेच, वेगवेगळ्या ठिकाणी प्राधिकरणाचे प्रकल्पही कार्यान्वयीत आहेत. शासनाने त्यांच्या मालकीच्या मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील रिक्त जमीनीही परिरक्षणासाठी प्राधिकरणाकडे सुपूर्त केल्या आहेत. **प्राधिकरणाच्या जमिनीचे व मालमत्तेचे अतिक्रमण, नुकसानी पासून संरक्षण करण्यासाठी प्राधिकरण नियत कार्यपध्दतीनुसार या क्षेत्रातील कार्यरत असलेल्या संस्थांकडून निविदा मागवून पॅनल तयार करते.** संबंधीत संस्थांकडून निर्धारित अटी व शर्तीवर **मनुष्यबळ पुरविण्याच्या दराचा प्रामुख्याने समावेश असतो.**

**<u>नेमणुकीचे अधिकार व कार्यपध्दती</u>**

२. अशा संस्थांची निविदा मागवून नियुक्ती करण्याबाबतच्या प्रस्तावास **मा. महानगर आयुक्त यांची मान्यता घेऊन निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात येते.** अशा संस्थांची **नियुक्ती करण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीस आहेत.** प्राधिकरणाच्या **कार्यकारी समितीचे अध्यक्ष शासनाचे मुख्य सचिव असून, सदस्य नगर विकास विभागाचे सचिव, गृहनिर्माण विभागाचे सचिव, बृहन्मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक, प्राधिकरणाचे महानगर आयुक्त व तीन विशेषतज्ञ (श्री. द. म. सुखटणकर, शासनाचे माजी मुख्य सचिव, श्री. एन. व्ही मेरानी, शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे माजी प्रधान सचिव, श्री. संख्ये, वित्तीय क्षेत्रातील विशेषतज्ञ), इत्यादी आहेत.** प्राप्त झालेल्या निविदांची छाननी करून, **सक्षम व पात्र संस्थांची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर केला जातो. कार्यकारी समितीने मान्यता दिल्यानंतर संबंधीत संस्थेच्या नियुक्तीबाबत पुढील कार्यवाही केली जाते.**

**<u>संस्थांची नेमणूक करण्याची कार्यपध्दती</u>**

३. कार्यकारी समितीने मान्यता दिल्यानुसार निविदा प्रक्रियेस न्युनतम **प्राप्त झालेल्या दराने** निविदाकारांना प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या ठिकाणी निर्धारित **केलेले मनुष्यबळ ३ पाळीमध्ये पुरविण्याचे कार्यादेश दिले जातात.** संबंधीत संस्थांना निर्धारित केलेले मनुष्यबळ ३ पाळीमध्ये त्या-त्या ठिकाणी पुरविणे आवश्यक असते. मिळकतीच्या ठिकाणी **नियुक्त करावयाचे मनुष्यबळ** त्या ठिकाणच्या परिस्थितीनुरूप **मा. अतिरिक्त महानगर आयुक्त / मा. महानगर आयुक्त यांच्या मान्यतेने ठरविले जाते.** तसेच, वेगवेगळया मालमत्तेच्या ठिकाणी नियुक्त केलेल्या **मनुष्यबळाचा आढावा घेण्यास मा. महानगर आयुक्तांनी समिती नियुक्त केली असुन, सदर समितीमार्फत प्रत्येक ६ महिन्यांनी आढावा घेतला जातो** व त्याप्रमाणे मनुष्यबळ त्या-त्या ठिकाणी परिस्थितीनुरूप कमीअधिक

करण्याबाबतची कार्यवाही केली जाते. मनुष्यबळ वाढवावयाचे असल्यास उपरोक्त नमुद केल्यानुसार मा. अतिरीक्त महानगर आयुक्त अथवा मा. महानगर आयुक्त यांची मान्यता घेतली जाते.

**संस्थांच्या नियुक्तीचा उदेश व दंडनीय कार्यवाही**

४. संबंधीत संस्थांनी त्यांना दिलेल्या जमीनीचे / मिळकतीचे अतिक्रमणापासून तसेच, नुकसानीपासून व गैरवापरापासून रक्षण करणे आवश्यक आहे. त्यामध्ये काही हलगर्जीपणा झाल्यास, प्राधिकरणास झालेल्या नुकसानाची भरपाई संबंधीत संस्थेच्या देयकातून केली जाते. तसेच, काही अतिक्रमण झाल्यास सदरचे अतिक्रमण काढण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची असून झालेल्या अतिक्रमणाबाबत दंडणीय कार्यवाही केली जाते. **प्रामुख्याने प्राधिकरणाची जमिन / मिळकत अतिक्रमणापासून नुकसानीपासुन व गैरवापरापासुन संरक्षित असुने हा उद्देश आहे.**

**संस्थांना देयक अदा करण्याची कार्यपध्दती**

५. प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या संस्थेसाठी त्यांनी नियुक्त केलेल्या मनुष्यबळाचे **देयक प्रत्येक महिना पुर्ण झाल्यानंतर, पुढील महिन्यात दिले जाते.** देयक अदा करताना संबंधीत संस्थेने या संदर्भात असलेल्या **सर्व वैधानिक नियमांची पुर्तता केली असल्याबाबत त्यांचे घोषणा पत्र घेतले जाते,** जसे की, भविष्य निर्वाह निधी, कामगार विमा योजना, इत्यादी. संबंधीत संस्थांचे मनुष्यबळ कार्यरत असताना **क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत प्रत्येक महिन्यात कमीतकमी ४ ते ५ वेळेस तपासणी केली जाते.** या तपासणीमध्ये नेमुन दिलेले मनुष्यबळ या ठिकाणी कार्यरत आहे किंवा नाही ?, नेमुण दिलेल्या प्राधिकरणाच्या जमिनीचे / मिळकतीचे सुयोग्यरित्या रक्षण झाले आहे किंवा नाही ?, कोणतेही अतिक्रमण / गैरवापर, नुकसान झाले नाही ना ?, इत्यादी बाबतचा समावेश असलेला क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी दिलेला त्या-त्या महिन्यांचा अहवाल एकत्रित करून त्या क्षेत्रासाठी कार्यरत असलेल्या सहा. भुमि व मिळकत व्यवस्थापक यांच्यामार्फत त्याची छाननी करून, एकत्रित अहवाल प्राप्त करून, **त्याबाबत काही दंडणीय कार्यवाही असल्यास तसा दंड आकारून, देयक अदा करण्याबाबत कार्यवाही केली जाते. मनुष्यबळ अनुपस्थितीत असल्यास अशा मनुष्यबळाची सरासरी काढुन तेवढया मनुष्यबळाचे मासिक शुल्क देयकातून वजा केले जाते,** म्हणजेच, तपासणीमध्ये अनुक्रमे २, १, २, ० असे मनुष्यबळ अनुपस्थितीत असल्याचे निदर्शनास आल्यास एकुण मनुष्यबळाची परिगणना करून, म्हणजेच ५ मनुष्यबळ यास ४ ने भागुण, म्हणजेच १.२५ गुणांकात १ इतक्या मनुष्यबळाचे मासिक शुल्क देयकातून वजा केले जाते. जर **अतिक्रण झाल्यास सदरचे अतिक्रमण संबंधीत संस्थेमार्फत जोपर्यंत काढले जात नाही, तोपर्यंत त्या ठिकाणच्या मालमत्तेचे / जमिनीचे परिरक्षणाचे देयक संबंधीत संस्थेस अदा केले जात नाही. नुकसान झाले असल्यास त्याची परिगणना अभियांत्रिकी विभागामार्फत करून, तेवढया रक्कमेची वसुली संबंधीत संस्थेकडून केली जातो.**

**चालू निविदा मधील सुधारित अट**

६. अशा संस्थेच्या नियुक्ती करीता चालु टेंडर प्रक्रियेमध्ये उपरोक्त कार्यपध्दतीसह संबंधित **संस्थांकडुन देयकासोबत त्या-त्या ठिकाणचे हजेरी पत्रक, नियुक्त केलेल्या मनुष्यबळाचे मागील महिन्याच्या कालावधीचा पगार बॅकेमार्फत अदा केल्याबाबतचा पुरावा, तसेच नियुक्त केलेल्या मनुष्यबळाच्या पगारातुन भविष्यनिर्वाह निधी / कामगार विमा योजनेचे अशंदान व संस्थेचे अंशदान संबंधीत प्राधिकाऱ्याकडे भरणा केल्याबाबतचा पुरावा देयकासोबत सादर करणे आवश्यक केले आहे.**

७. उपरोक्त नमुद केल्यानुसार, सदरच्या संस्थांच्या नियुक्तीकरीता प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची मान्यता घेऊन कार्यवाही केली जाते. **मा. महानगर आयुक्त यांनी भुमि व मिळकत शाखेच्या बाबतीत असलेली देयके आहरण व संवितरण अधिकारी म्हणून भुमि व मिळकत व्यवस्थापक यांनी साक्षांकित करण्याचे अधिकार दिलेले आहेत. तसेच, कार्यकारी समितीने मंजूरी दिल्यानूसार, देयके मंजूर करण्याचे अधिकार भुमि व मिळकत शाखेचे विभाग प्रमुख म्हणून मा. उप महानगर आयुक्त (भुमि व मिळकत शाखा) यांना आहेत.** उपरोक्त परिच्छेद-४ मध्ये नमुद केलेल्या कार्यपध्दतीनूसार देयके मंजूरीचा प्रस्ताव भुमि व मिळकत शाखेतंर्गत असलेल्या लेखा शाखेकडुन देयकाची तपासणी करुन उप महानगर आयुक्त (भुमि व मिळकत शाखा) यांना मंजूरीसाठी सादर केला जातो. मंजूरी प्राप्त झाल्यानंतर भुमि व मिळकत व्यवस्थापक यांच्या स्वाक्षरीने देयके वितरणासाठी लेखा शाखेकडे पाठविली जातात.

८. प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीनुसार संस्थांनी नियुक्त केलेल्या मनुष्यबळाचा वेळोवळी आढावा घेतला जातो, मनुष्यबळाची तपासणी केली जाते, मनुष्यबळ अनुपस्थित असल्यास सरासरी अनुपस्थित मनुष्यबळाचे मासिक वेतन देयकातून वजा केले जाते, काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई देयकातून केली जाते, अतिक्रमण झाल्यास संस्थेकडून अतिक्रमण काढून घेण्यात येते, अन्यथा दंडनीय कार्यवाही केली जाते व अंतिमत: प्राधिकरणाची मिळकत / जमिन संरक्षीत असल्याची खातरजमा केली जाते.

*****